**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेचा डिजिटल उपक्रम – व्हॉट्सॲप चॅट बॉटद्वारे नागरिक सेवा आता एका क्लिकवर**

मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांच्या सेवेत सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत असून, प्रशासन अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतिमान करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे. या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलताना महानगरपालिकेने 'व्हॉट्सॲप चॅट बॉट सेवा' सुरू केली आहे. या सुविधेमुळे नागरिकांना आता अनेक सेवा आणि माहिती घरबसल्या, फक्त एका क्लिकवर मिळणार आहे.

व्हॉट्सॲप चॅट बॉट ही एक अत्याधुनिक संवाद प्रणाली असून नागरिकांनी फक्त ९९६७६ ११२३४ या क्रमांकावर "Hi" असा संदेश पाठविला की, पुढे एक संवाद सुरू होतो आणि नागरिकांच्या गरजेनुसार विविध पर्याय त्यांच्या स्क्रीनवर उपलब्ध होतात. या प्रणालीचा उद्देश म्हणजे नागरिकांना शासकीय कार्यालयात न जाता त्वरित आणि अचूक सेवा मिळवून देणे.

ही सेवा नागरिकांना खालील बाबतीत त्वरित माहिती व मदत उपलब्ध करून देते – मालमत्ता कर भरणा लिंक, मालमत्ता कर देयकाची दुय्यम प्रत आणि मालमत्ता कर भरणा पावती, पाणीपट्टी कर भरणा लिंक, पाणीपट्टी कर भरणा देयकाची दुय्यम प्रत आणि पाणीपट्टी कर भरणा पावती, आरटीएस सेवा (Right to Services), नागरिकांच्या तक्रारी नोंदवणे, आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित माहिती, पाणी टँकर बुकिंग सेवा, शासकीय रुग्णालयांची यादी, उद्यानांची माहिती, आणि स्मार्ट सिटी (MBMC City) संबंधित सेवा. महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला असून त्यांनी यासाठी संबंधित विभागांना कार्यक्षम व तत्पर सेवा देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, या डिजिटल माध्यमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.